समाज प्रबोधन संस्थेचे प्रकाशन

समाज प्रबोधन पत्रिका

वर्ष ६२ । अंक २४६ । एप्रिल – मे – जून २०२४
ISSN No. 0973 - 2845 । RNI No. : 11294/63

अंतरंग

☐ लेख

समाज प्रबोधन पत्रिका

प्रकाशक
प्रा. शैलेंद्र खरात
सचिव, समाज प्रबोधन संस्था, पुणे.

मुद्रक
भारती मुद्रणालय,
८३२ ई, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर.
फोन : २६५४३२९

या अंकाच्या प्रकाशनासाठी
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने
अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही. अनुदानाबद्दल आम्ही मंडळाचे आभारी आहोत.

कार्यालयीन पत्ता : डॉ. अशोक चौसाळकर, संपादक,
समाज प्रबोधन पत्रिका, ४१६, आर. के. नगर,
हाऊसिंग सो. नं. ६, पाचगाव, कोल्हापूर - ४१६ ०१३.
फोन : (०२३१) २६३९४८५, ९४२११७२८६८.
e-mail : prabodhan.patrika@gmail.com

या अंकाचे मूल्य : ₹ २०/-

लेख

मो. अली निजामोद्दीन माळेगावकर



भारतीय मुस्लिमांचे राजकीय प्रतिनिधित्व आणि वजाबाकीचे राजकारण

२०२४ सालच्या लोकसभा निवडणुकीत मुस्लीम मतदार हा घटक महत्त्वपूर्ण ठरला आहे. इंडिया आघाडीच्या जागा वाढवण्यात हा घटक महत्त्वपूर्ण ठरला असला, तरी त्या तुलनेत मुस्लिमांना कमी प्रमाणात प्रतिनिधित्व मिळताना दिसून येते. २०२४ मध्ये १८ व्या लोकसभेत केवळ २४ मुस्लीम उमेदवार खासदार म्हणून निवडून आले आहेत. २०१९ च्या लोकसभेत २६ मुस्लीम खासदार निवडून आले होते. ५४३ सदस्यांच्या सभागृहात आतापर्यंतची ही दुसरी सर्वात कमी मुस्लीम खासदारांची संख्या आहे. २४ पैकी १४ मुस्लीम खासदार हे मुस्लीम बहुसंख्य असलेल्या मतदारसंघातून निवडून आले आहेत. २०१४ सालच्या लोकसभेत सर्वात कमी २३ मुस्लीम खासदार निवडून आले होते, तर १९८० सालच्या लोकसभेत मुस्लीम समाजाचे सर्वाधिक ४९ मुस्लीम खासदार निवडून आले होते.

धार्मिक लोकसंख्येच्या बाबतीत मुस्लीम समाज देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. प्रत्येक निवडणुकीच्या काळात मुस्लीम मतदारांकडे निर्णायक घटक म्हणून पाहिले जात असले, तरी लोकसंख्येची अधिक टक्केवारी असलेल्या राज्यांमध्येही मुस्लीम प्रतिनिधित्व कमी असल्याचे दिसून येते. २०१४ मध्ये भाजप सत्तेत आल्यापासून

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
आबेदा इनामदार महाविद्यालय, पुणे.
Email ID:-
malegaonkarali@gmail.com
Contact No:- 9049741447

बहुतांश विरोधी पक्षांनी ध्रुवीकरणाच्या भीतीने मुस्लीम उमेदवारांना तिकीट देण्यास टाळाटाळ केली. प्रत्येक लोकसभा निवडणुकीत मुस्लिम खासदारांची संख्या घटत असल्याचे दिसून येते. भारतीय राष्ट्रीय विकासात्मक, सर्वसमावेशक आघाडीचे (इंडिया आघाडीचे) प्रमुख घटक पक्ष असलेल्या काँग्रेस, सपा आणि टीएमसीने मुस्लीम उमेदवारांना कमी जागा दिल्या आहेत. २०२४ सालच्या लोकसभा निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने केवळ १९, ऑल इंडिया तृणमूल काँग्रेसने केवळ ६, समाजवादी पक्षाने केवळ ४ आणि बहुजन समाज पक्षाने सर्वाधिक ३५ मुस्लीम उमेदवारांना उमेदवारी दिली होती.

२०२४ मध्ये मुस्लीम मतदारांनी अतिशय विचारपूर्वक मतदान केले आहे. भारतीय जनता पक्षाला पराभूत करण्यासाठी मुस्लीम नेहमीच राजकारणात भाग घेतात. निवडणुकीपूर्वी नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्षाने प्रचारात हिंदुत्वाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवला. भारतीय जनता पक्षाने आपल्या मूळ मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी मुस्लिमविरोधी वक्तव्यांवर मोठ्या प्रमाणात भर दिला. त्यामुळे मुस्लीम मतदार हा इंडिया आघाडीच्या बाजूने एकवटला; पण त्या तुलनेत हिंदू मतदार भाजपच्या बाजूने पूर्णतः एकवटला नाही. या अर्थाने लोकसभेत पूर्ण बहुमत मिळवण्यात भाजपला आलेले अपयश हा या रणनीतीचा स्पष्ट परिणाम मानला जात आहे. धार्मिक आधारावर मतदारांचे ध्रुवीकरण करण्याच्या भाजपच्या प्रयत्नांमुळे देशभरातील मुस्लिमांना बिगर भाजप उमेदवारांना मतदान करण्यास प्रोत्साहन मिळाल्याचा दावा केला जात आहे.

मुस्लिमांनी इंडिया आघाडीला मोठ्या संख्येने पाठिंबा दिला. परंतु मुस्लीम पाठिंब्याबाबत इंडिया आघाडीने कोणतीही चर्चा टाळण्याचा प्रयत्न आतापर्यंत केला आहे. सक्रिय मुस्लीम पाठिंब्याशिवाय इंडिया आघाडीचे यश जवळजवळ अशक्य होते, ही वस्तुस्थिती आहे. इंडिया आघाडीने मुस्लिमांचे समर्थन केल्यास हिंदू मतदार नाराज होतील, असा एक समज आहे. मुस्लीम आणि भाजपचे राजकीय विरोधक यांच्यात छुपा समझोता असून ते एकमेकांना समजून घेतात आणि त्यानुसार परस्पर फायद्याची रणनीती आखतात, असे म्हटले जाते.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मुस्लिमांच्या राजकीय वर्तनाचा सूक्ष्म अभ्यास केल्यास असे स्पष्टपणे अधोरेखित होते की, मुस्लीम समाजाचा लोकशाही प्रक्रियेवर प्रचंड विश्वास आहे. गेल्या काही वर्षांत मुस्लीम प्रतिनिधित्व कमी झाले असले तरी मुस्लीम मतदार राजकारणापासून दूर गेलेले नाहीत. धार्मिक किंवा सांप्रदायिक चिंता हेच मुस्लिमांच्या मतदानाचे एकमेव प्रेरक घटक आहेत, हा आरोपही फेटाळून लावला जातो. किंबहुना निवडणुकीच्या आखाड्यात धर्मनिरपेक्षतेचे सकारात्मक राजकारण अजूनही शक्य आहे, हे दिसून आले.

इंडोनेशिया आणि पाकिस्तान नंतर सर्वाधिक मुस्लीम भारतात राहातात. जगातील मुस्लीम लोकसंख्येत भारत तिसऱ्या क्रमांकावर आहे. जगातील एकूण मुस्लीम लोकसंख्येच्या शे. ११% मुस्लीम भारतात राहातात. २०११ च्या जनगणनेनुसार भारताच्या एकूण लोकसंख्येत मुसलमानांचे प्रमाण शे. १४.२३% इतके आहे. लक्षद्वीप, जम्मू आणि काश्मीरमध्ये मुस्लीम बहुसंख्य आहेत. लक्षद्वीप या केंद्रशासित प्रदेशात मुस्लिमांची लोकसंख्या शे. ९६.५८% आहे. जम्मू आणि काश्मीर भागात मुस्लिमांची लोकसंख्या शे. ६४.३१% आहे. आसाम, पश्चिम बंगाल, केरळ, उत्तर प्रदेश आणि बिहार या राज्यात मुस्लीम समुदायाची लोकसंख्या लक्षणीय आहे. आसाममध्ये ३४.२२%, पश्चिम बंगालमध्ये २७.०१%, केरळमध्ये २६.५६%, उत्तर प्रदेशमध्ये १९.२६%, बिहार १६.८७%, झारखंडमध्ये १४.५३%, उत्तराखंडमध्ये १३.९५%, कर्नाटकमध्ये १२.९२%, दिल्लीमध्ये १२.८६% असून महाराष्ट्रात मुस्लिमांचे प्रमाण ११.५४% इतके आहे. अरुणाचल प्रदेश, हिमाचल प्रदेश, मिझोराम, नागालँड, ओरिसा, पंजाब आणि सिक्कीम या राज्यात मुस्लीम लोकसंख्या २% पेक्षा कमी आहे, तर मिझोराम या राज्यामध्ये मुस्लिमांच्या लोकसंख्येची टक्केवारी ०.६६% सर्वात कमी आहे. दादरा आणि नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशांमध्ये मुस्लिमांच्या लोकसंख्येची सर्वात कमी टक्केवारी २% आहे.

भारतीय मुस्लीम समाज विविध प्रादेशिक भागात विखुरलेला आहे. भारतीय मुस्लीम हे केवळ विखुरलेले

अल्पसंख्याक नाहीत, तर बहुसंख्य भारतीय राज्यांमधील इतर सामाजिक गटांच्या तुलनेत त्यांची संख्याही बरीच कमी आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारतात शे. ४०% मुस्लीम शहरी भागात राहातात. भारतीय मुस्लीम हे भारतातील इतर कोणत्याही धार्मिक समूहापेक्षा जास्त प्रमाणात शहरी भागात वास्तव्यास आहेत. मुस्लीम समुदायाचे भारतात सर्वाधिक नागरीकरण झाले आहे. ९७% लोकसभा मतदारसंघांमध्ये मुस्लीम अल्पसंख्याक आहेत. केवळ १५ लोकसभा मतदारसंघांमध्ये मुस्लीम बहुसंख्य आहेत. भारतातील बहुसंख्य लोकसभा मतदारसंघ प्रामुख्याने ग्रामीण आहेत. निमशहरी किंवा शहरी स्वरूपाच्या शे. ३८% लोकसभा मतदारसंघांमध्ये मोठ्या संख्येने मुस्लीम राहातात. यात केवळ ७ मतदारसंघ आहेत जिथे मुस्लीम मोठ्या संख्येने आहेत.

मुस्लीम प्रतिनिधित्वाचा ऐतिहासिक आढावा

१९४७ साली भारतीय उपखंडाची फाळणी होऊन भारत आणि पाकिस्तान ही दोन स्वतंत्र राष्ट्रे अस्तित्वात आली. भारतीय मुस्लीम समाजाला अल्पसंख्याकाचा दर्जा प्राप्त झाला. लोकशाहीत निष्पक्ष प्रतिनिधित्व हे इष्ट ध्येय आहे. अत्यंत बहुविविधता असलेल्या समाजात संख्यात्मकदृष्ट्या अल्पसंख्याक समाजाचे प्रातिनिधिक दावे पूर्ण होतील याची खात्री नसते. संख्यात्मकदृष्ट्या अल्पसंख्याक समाजाचे स्वतःचे मूलभूत प्रतिनिधित्व नेहमीच पुरेसे नसते. राजकीय क्षेत्रात भारतीय मुस्लिमांचे प्रतिनिधित्व सातत्याने कमी होत आहे. भारतीय मुस्लिमांचे राजकीय प्रतिनिधित्व कमी असणे ही अलीकडची घटना नाही. ऐतिहासिकदृष्ट्या मुस्लीम समुदायाचे प्रतिनिधित्व त्यांच्या लोकसंख्येतील वाट्यापेक्षा कमी राहिले आहे. मुस्लीम समाज जवळपास सर्वच सामाजिक-आर्थिक निर्देशांकात पिछाडीवर आहे. भारतीय मुस्लिमांचे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय मागासलेपण हे समाजाचे वैशिष्ट्य राहिले आहे.

लोकशाही व्यवस्था अनेकदा कमी प्रतिनिधित्व असलेल्या सामाजिक गटांचे पुरेसे राजकीय प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्यासाठी सकारात्मक भेदभावाचे तत्त्व वापरते. घटनात्मक यंत्रणेद्वारे अल्पप्रतिनिधित्वाच्या समस्येवर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जातो. मुस्लिमांसाठी राखीव जागांसारखी यंत्रणा अस्तित्वात नाही. म्हणूनच, भारतीय मुस्लिमांचे राजकीय प्रतिनिधित्व इतर सामाजिक गटांच्या पाठिंब्यावर अवलंबून असते. राजकीय क्षेत्रात मुस्लिमांचे प्रतिनिधित्व कमी असण्याची अनेक कारणे आहेत. १.धार्मिक आधारावर भारतीय उपखंडाच्या फाळणीचा वारसा आहे. २.भारतीय मुस्लीम समाज विविध प्रादेशिक भागात विखुरलेला आहे. ३.मुस्लीम समाजाला आरक्षण दिल्यास बहुसंख्य समाज दुरावण्याची भीती राजकीय वर्गाला वाटत आहे.

भारतीय मुस्लीम समाज भौगोलिकदृष्ट्या विखुरलेला असल्यामुळे अखिल भारतीय स्तरावर मुस्लीमप्रणीत सक्षम पक्षाची स्थापना करणे शक्य होणार नाही. त्यामुळे राष्ट्रीय आणि प्रादेशिक पातळीवर मुख्य प्रवाहातील पक्षांच्यासोबत राहून राजकारण करण्यास प्राधान्य दिले जाते. सामाजिकदृष्ट्या विखुरलेल्या गटाला केवळ त्यांच्या हिताचे प्रतिनिधित्व करणारे राजकीय व्यासपीठ तयार करणे अवघड होते. कारण मुस्लीमप्रणित सामुदायिक हिताचा पाठपुरावा इतरांना विभक्त करू शकतो. मुस्लीमप्रणित पक्षाला मतदारसंघ स्तरावर बहुमतापर्यंत पोहोचण्यापासून रोखू शकतो. जिथे वांशिक-आधारित सामाजिक आणि राजकीय संघटन प्रचलित आहे तेथे त्यांच्या पसंतीच्या उमेदवाराच्या निवडीवर नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुस्लीमप्रणित पक्षांना निवडणुकीत यश मिळालेले नाही. मुस्लिमांची संख्या जास्त असलेल्या प्रदेशात त्यांना यश मिळाले आहे. केरळमध्ये इंडियन युनियन मुस्लीम लीग, तेलंगणात ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन आणि आसाममध्ये ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट यांना मर्यादित यश मिळाले. जम्मू-काश्मीर या केंद्रशासित प्रदेशातही मुस्लीम प्रतिनिधी बहुधा मुस्लीमबहुल काश्मीर खोऱ्यातून निवडून येतात.

राजकीय क्षेत्रात मुस्लीम प्रतिनिधी कमी असण्यामागचे एक कारण म्हणजे मतदारसंघातील इतर मतदार दुरावण्याच्या भीतीने राजकीय पक्षांनी मुस्लीम उमेदवारांना उमेदवारी दिली नाही. स्वातंत्र्यानंतरच्या काळात फाळणीचे परिणाम राजकीय अभिजनांच्या

राजकीय निवडीवर प्रभाव टाकत राहिले. लोकसभेत मुस्लिमांचे प्रतिनिधित्व मुस्लिमांच्या लोकसंख्येच्या टक्केवारीपेक्षा कमी आहे. लोकसभेतील मुस्लिमांच्या प्रतिनिधित्व त्याची सरासरी ५% इतकी आहे. १९५२ ते १९६७ हा टप्पा भारतीय राजकारणात काँग्रेस पक्षाच्या वर्चस्वाचा होता. पूर्वी काँग्रेस पक्षाच्या तिकिटावर बहुसंख्य मुस्लीम प्रतिनिधी निवडून येत असत. काँग्रेस पक्षाची निवडणुकीच्या राजकारणात पडझड झाली. १९५२ ते १९७७ या काळात झालेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये प्रमुख पक्षांचे केवळ ५% मुस्लीम उमेदवार होते. त्यानंतरच्या वर्षांत मुस्लीम उमेदवारांना उमेदवारी देण्याचे प्रमाण वाढल्याने मुस्लीम उमेदवारांची टक्केवारी जवळपास दुप्पट झाली. मुस्लीम उमेदवारांची संख्या वाढली असली तरी ते निवडून येण्याचे प्रमाण खूपच कमी आहे.

१९८० आणि १९८४ या दोनच लोकसभा निवडणुकांमध्ये मुस्लीम समाजाचे प्रतिनिधित्व अनुक्रमे ९ आणि ८% म्हणजेच लोकसंख्येच्या टक्केवारीच्या सर्वात जवळ जाणारे होते. काँग्रेस पक्ष आणि इतर पक्षांनी नव्याने राजकीयदृष्ट्या संघटित झालेल्या सामाजिक गटांचा पाठिंबा मिळवण्यासाठी केलेल्या एकत्रित प्रयत्नांचा हा काही अंशी परिणाम होता. या काळात लोकशाही परिवर्तन आणि प्रसारामुळे मुस्लीम समाजाला राजकीय लाभ झाला. भाजपसह इतर जात आणि प्रदेशाधारित पक्षांचा उदय झाला. काँग्रेस पक्षाच्या पडझडीच्या या टप्प्यात मुस्लीम प्रतिनिधी भाजपशिवाय अन्य बिगर काँग्रेसी राजकीय पक्षांच्या तिकिटावर निवडून आले.

मुस्लीम प्रतिनिधित्व लोकसभा निवडणूक – १९५२ ते २०२४

वर्ष	मुस्लीम लोकसंख्या (%)	लोकसभेत खासदारांची संख्या	लोकसभेतील प्रतिनिधित्व (%)
१९५२-१९५७	१०	२५	५.११
१९५७-१९६२	१०.	२३	४.६६
१९६२-१९६७	११	२६	५.२६
१९६७-१९७१	१०	२८	५.३८
१९७१-१९७७	११	२८	५.४१
१९७७-१९८०	११	३२	५.९०
१९८०-१९८४	११	४९	९.०४
१९८४-१९८९	११	४५	८.३०
१९८९-१९९१	११	३३	६.२४
१९९१-१९९६	१२	२९	५.३७
१९९६-१९९८	१२	२७	४.९७
१९९८-१९९९	१२	२८	५.१६
१९९९ - २००४	१२	३२	५.८९
२००४-२००९	१२	३५	६.४५
२००९-२०१४	१३	२८	५.१६
२०१४-२०१९	१४	२३	४.२४
२०१९-२०२४	१४	२६	४.७९
२०२४	१४	२४	४.४२

Source: Statistical Reports of Election Commission of India

१९८० च्या दशकात उत्तर भारतात काँग्रेस पक्षाची राजकीय पडझड झाल्यानंतर प्रथम जनता दल त्याच्या फुटीतून नंतर उत्तर प्रदेशात समाजवादी पक्ष, बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दल या पक्षांची स्थापना झाली. बहुजन समाज पक्षही या काळात पुढे आला. काँग्रेस पक्षाने रिकामी केलेली जागा भरून काढण्यासाठी या पक्षांनी मुस्लिमांपर्यंत पोहोचण्यासाठी मुस्लीम उमेदवारांना उमेदवारी दिली. भाजप नेते लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वाखालील राममंदिर निर्माण कारवेला मुलायम सिंग यादव व लालूप्रसाद यादव यांनी विरोध केल्याने मुस्लिमांचा पाठिंबा त्यांना मिळू लागला. १९९० च्या दशकापासून मुस्लिमांना उमेदवारी प्रामुख्याने उत्तर भारतातील या पक्षांकडून किंवा पूर्वेकडील अखिल भारतीय तृणमूल काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी दिली गेली. केरळमध्ये इंडियन युनियन मुस्लीम लीग, तेलंगणात ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन आणि आसाममध्ये ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट सारख्या मुस्लीमप्रणित पक्षांनी अलीकडच्या काळात आपापल्या बालेकिल्ल्यांवर आपला प्रभाव कायम ठेवला आहे. काँग्रेस पक्षाने पूर्वीच्या तुलनेत कमी उमेदवार दिले असले तरी मुस्लीम उमेदवारांना उमेदवारी देणाऱ्या इतर बिगरभाजप पक्षांच्या तुलनेत त्यांच्या उमेदवारांच्या यशाचे प्रमाण चांगले आहे.

१९५२ पासून लोकसभेत बहुसंख्य मुस्लीम प्रतिनिधी हे उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार आणि केरळ या केवळ चार राज्यांमधून आणि जम्मू-काश्मीर केंद्रशासित प्रदेशातून आले आहेत. कारण २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील ४६% मुस्लीम उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि बिहार या केवळ तीन राज्यांमध्ये राहातात. जम्मू-काश्मीर केंद्रशासित प्रदेशात आणि केरळ या राज्यांत देशातील एकूण मुस्लीम लोकसंख्येच्या केवळ शे. ५% राहातात.

पक्षव्यवस्थेत व्यापक व्यवस्थात्मक बदल झाल्यामुळे आणि राजकीय स्पर्धेच्या स्वरूपात बदल झाल्यामुळे मुस्लीम समुदायाच्या प्रतिनिधित्वावर परिणाम झाल्याचे दिसून येते. १४ व्या लोकसभेपर्यंतच्या सलग प्रत्येक निवडणुकीत बहुसंख्य मुस्लीम प्रतिनिधी ज्या मतदारसंघात मुस्लीम समाज अल्पमतात होता त्या मतदारसंघातून निवडून आले. १५व्या, १६व्या आणि १७व्या या गेल्या तीन लोकसभा निवडणुकांमध्ये मुस्लीम प्रतिनिधी प्रामुख्याने जिथे मुस्लीम समाजाची लोकसंख्या किमान ४०% आहे, अशा मतदारसंघातून निवडून आले आहेत. पूर्वी पक्षांकडून मुस्लिमांना त्यांच्या संघटनात्मक क्षमतेच्या जोरावर अल्पसंख्याक असलेल्या मतदारसंघातून उमेदवारी देऊन निवडून आणले जात असे.

लोकसभेतील मुस्लीम प्रतिनिधित्वात झालेल्या घसरणीचे कारण भाजपच्या अंतर्गत हिंदू उजव्या विचारसरणीचे वैचारिक एकत्रीकरण हे आहे. भाजप आणि पुराणमतवादी विचारसरणीचा उदय आणि त्यातून मांडण्यात आलेले मुद्दे यामुळे भारतीय मुस्लिमांना उपलब्ध असलेला थोडाफार राजकीय अवकाशही संकुचित झाला. उत्तर आणि पश्चिमेकडील पारंपरिक बालेकिल्ल्यांच्या पलीकडे मुस्लीम उमेदवारांना यश मिळवता आले नाही. संख्यात्मकदृष्ट्या मुस्लिमांचे प्रतिनिधित्व १९८९ पासून २०१४ च्या संसदीय निवडणुकीपर्यंत स्थिर राहिले.

मुस्लीम प्रतिनिधित्व आणि २०१४ ची लोकसभा निवडणूक

२०१४ ची लोकसभा निवडणूक ऐतिहासिक ठरली. गेल्या तीन दशकांत पहिल्यांदाच भाजप या एका पक्षाला स्वबळावर बहुमत मिळवता आले. २०१४ च्या लोकसभा निकालाने भारतीय राजकारणाच्या मध्यवर्ती असलेल्या काँग्रेस पक्षाची जागा भाजपने घेतली. भाजप आणि त्याच्या हिंदू राष्ट्रवादी धोरणांना हिंदू मतदारांनी पसंती दर्शविली. भाजपच्या धोरणांना दिलेला हा पाठिंबा नेहमीच अल्पसंख्याक विरोधी नसला तरी तो निश्चितपणे बहुसंख्याकवादी आणि धार्मिक होता. म्हणूनच अखिल भारतीय हिंदू अस्मिता निर्माण करून हिंदू राष्ट्र वादाच्याआधारे राजकीय यश संपादित केले.

भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (एनडीए) कामगिरीमुळे काँग्रेसप्रणित संयुक्त पुरोगामी आघाडीचा (यूपीए) पराभव झाला. राज्यातील पक्ष आणि प्रादेशिक पक्षही निवडणुकीत भाजपने उभे केलेले वैचारिक आव्हान पेलू शकले नाहीत. उत्तर प्रदेशात बसप आणि

सपा, बिहारमध्ये राजद आणि काँग्रेस पक्ष हे यापूर्वी मुस्लीम मतांचे पारंपरिक दावेदार राहिले आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात मुस्लीम प्रतिनिधी या पक्षांमधून निवडून आले आहेत. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी मोठ्या संख्येने मुस्लीम उमेदवारांना उमेदवारी दिली. पण या पक्षांच्या वाईट निवडणूक कामगिरीमुळे मुस्लीम प्रतिनिधित्वावर विपरित परिणाम झाला.

२०१४च्या लोकसभा निवडणुकीत मुस्लीम उमेदवारांची कामगिरी निराशाजनक होती. लोकसभेत केवळ २२ मुस्लीम उमेदवार निवडून आले. १९५२ च्या लोकसभेनंतर मुस्लीम समाजाचे सर्वात कमी प्रतिनिधित्व होते. भाजपने एकही मुस्लीम उमेदवाराला निवडणुकीतचे तिकीट दिले नव्हते. स्वतंत्र भारताच्या इतिहासात केंद्रातील सत्ताधारी पक्षाचे लोकसभेत एकही मुस्लीम समाजाचे प्रतिनिधी नसल्याची ही पहिलीच घटना होती. भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) उभे केलेले सातही मुस्लीम उमेदवार निवडणुकीत पराभूत झाले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारतातील मुस्लिमांची सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या उत्तर प्रदेशातून भाजपने एकाही मुस्लीम उमेदवाराला तिकीट दिले नव्हते. २०१४च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी लोकसभेवर निवडून गेलेले सर्वाधिक मुस्लीम उमेदवार यूपीमधून आले होते. त्यामुळे सपा आणि बसप या दोन्ही पक्षांच्या निवडणुकीतील वाईट कामगिरीचा परिणाम त्यांच्या मुस्लीम उमेदवारांवरही झाला.

१५ राज्यांमध्ये स्वबळावर किंवा आघाडीचा भाग म्हणून भाजपची सत्ता आहे. २०१४च्या लोकसभा निवडणुकीपासून भाजपने केलेल्या वाटचालीचा राज्य विधिमंडळातील मुस्लीम प्रतिनिधित्वावरही विपरित परिणाम झाला आहे. २८ राज्यांच्या विधानसभांमध्ये पक्षाच्या १२८२ आमदारांपैकी भाजपचे केवळ ३ मुस्लीम आमदार आहेत. राज्यांच्या विधानसभांमध्ये एकूण विधिमंडळ सदस्यांच्या केवळ ७% मुस्लीम प्रतिनिधित्व होते. २०१८ मध्ये विधानसभा निवडणुकीच्या शेवटच्या फेरीनंतर राज्य विधिमंडळात समाजाचे प्रतिनिधित्व ७% होते.

भाजपने बहुसंख्याक विरोधात अल्पसंख्याक समाजाला उभे करून राजकीय मांडणी केल्याने भाजपच्या विचारधारेला यश आले आहे. ऐतिहासिकदृष्ट्या, भाजपने मुस्लिमांना कमी तिकिटे दिली आहेत. भाजपने मुस्लीम समुदायापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला नाही. कारण तसे केल्यास भाजपचे पारंपरिक समर्थक त्यांच्यापासून दुरावतील. २०१९च्या लोकसभा निवडणुका जवळ येईपर्यंत हिंदू मतांच्या इतर दावेदारांना पराभूत करून बहुसंख्य समाजावर आपली पकड मजबूत करण्यात भाजपला यश आले होते. हिंदू मते गमावण्याच्या भीतीने मुस्लीम मतांचे पारंपरिक दावेदार देखील आपले मत व्यक्त करण्यास घाबरताना दिसतात.

मुस्लीम प्रतिनिधित्व आणि २०१९ ची लोकसभा निवडणूक

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपप्रणित एनडीएने ३५३ जागांवर विजय मिळवला. भाजपने प्रथमच काँग्रेस पक्षापेक्षा जास्त जागा लढविल्या आणि २०१४ च्या २८२ जागांच्या संख्येत २१ जागांची भर घालून ३०३ जागांवर यश मिळवले. भाजपचा प्रचार पुन्हा एकदा विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती फिरला. पुलवामा हल्ला आणि बालाकोटमध्ये पाकिस्तानला भारतीय लष्कराने दिलेल्या प्रत्युत्तरानंतर २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत प्रचारात राष्ट्रवादाचा जोर वाढला होता. यातून भाजपला आपली पकड मजबूत करण्यास आणि आपली स्थिती सुधारण्यास मदत झाली. निवडणुकीचा अजेंडा भाजपला ठरविण्यात यश आल्याने विरोधकांची स्थिती कमकुवत झाली.

गोहत्येच्या घटना, शुक्रवारची नमाज सार्वजनिक ठिकाणी अदा करण्याविरोधात सातत्याने राबवलेली मोहीम, शहरांची आणि रस्त्यांची मुस्लीम नावे बदलणे, तिहेरी तलाक रद्द करण्याची मोहीम राबवणे, आंतरधर्मीय विवाहांना विरोध, धार्मिक अल्पसंख्याकांच्या बाजूने बोलणाऱ्या कार्यकर्त्यांना 'दहशतवाद्याचे सहानुभूतीदार' ठरवणे आणि काश्मीर प्रश्नाबाबत कठोर भूमिका घेणे हे भाजपच्या निवडणुकीच्या प्रचाराचे मुद्दे होते. भाजपने या मुद्द्यांच्या आधारे देशातील बहुसंख्याकवादी भावना

बळकट करण्यास हातभार लावला. बहुसंख्याकवादाच्या विरोधात मुस्लीम राजकीय प्रतिनिधित्व उभे राहिले.

मुस्लीम उमेदवारांची उमेदवारी आणि लोकसभेतील प्रतिनिधित्व विचारात घेतल्यास असे लक्षात येते की, १७ व्या लोकसभेतील २५ मुस्लीम खासदार ११ वेगवेगळ्या पक्षांचे आहेत. ८ वेगवेगळी राज्ये आणि २ केंद्रशासित प्रदेशांतून निवडून आले आहेत. या पक्षांनी ११९ मुस्लीम उमेदवार उभे केले होते. या उमेदवारांच्या यशाचे प्रमाण केवळ २.१% होते. २०१९ मध्ये लोकसभेत सर्वाधिक मुस्लीम उमेदवार ऑल इंडिया तृणमूल काँग्रेसचे होते. बहुजन समाज पक्ष, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, समाजवादी पक्ष, ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट, इंडियन युनियन मुस्लीम लीग, भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी), जम्मू-काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स, ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन आणि लोक जनशक्ती पार्टी या पक्षांकडून मुस्लीम उमेदवार निवडून आले आहेत.

ऑल इंडिया तृणमूल काँग्रेसचे ४, जम्मू-काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स, बहुजन समाज पक्ष, इंडियन युनियन मुस्लीम लीग, समाजवादी पक्ष, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे प्रत्येकी ३, ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीनचे २, भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी), राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट, लोक जनशक्ती पार्टीचे प्रत्येकी १ मुस्लीम प्रतिनिधी निवडून आले होते.

ज्या मतदारसंघात मुस्लीम अल्पसंख्य आहेत अशा मतदारसंघातून बहुसंख्य मुस्लीम उमेदवारांना उमेदवारी देण्यात आली होती. बसप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांनी ज्या मतदारसंघात मुस्लीम संख्येने अल्पसंख्य आहेत अशा मतदारसंघातून बहुसंख्य मुस्लीम उमेदवारांना उमेदवारी दिली आहे. दुसरीकडे उर्वरित नऊ पक्षांनी मुस्लीम लोकसंख्या किमान ४०% आहे अशा मतदारसंघात मुस्लीम उमेदवारांना तिकीट दिले. लोकसभेतील एनडीएचा एकमेव मुस्लीम प्रतिनिधी एलजेपीच्या तिकिटावर निवडून आला होता. काँग्रेस पक्षाची घसरण आणि सपा आणि बसपासारख्या पक्षांचे राजकीय भवितव्य अस्थिर असल्याकारणाने व भाजपच्या राजकीय वर्चस्वामुळे परंपरागतरीत्या मुस्लिमांना तिकीट देणाऱ्या पक्षांच्या मुस्लीम उमेदवारीवर विपरित परिणाम झाला. भाजपने आक्रमकपणे राबविलेल्या बहुसंख्याकवादी धोरणांमुळे हिंदू-मुस्लीम संघर्ष निर्माण झाला आहे. भाजपकडून पराभूत होण्याच्या भीतीने परंपरेने मुस्लिमांना उमेदवारी देणाऱ्या पक्षांनीही मुस्लिमांची संख्या लक्षणीय असलेल्या जागा वगळता इतर जागांवर मुस्लिमांना उमेदवारी दिली नाही. २०१४ च्या निवडणुकीचा अपवाद वगळता मुस्लिमांची संख्या लक्षणीय असलेल्या मतदारसंघातून मुस्लीम प्रतिनिधी निवडून येत आहेत. सर्वसाधारणपणे पक्षाची उमेदवारी ठरविताना उमेदवाराच्या विजयाचा प्रामुख्याने विचार केला जातो. मुस्लीम उमेदवारांना भाजपप्रणित एनडीएच्या विरोधात उमेदवारी दिल्यास मुस्लीम उमेदवारांची निवडणुकीत निवडून येण्याची शक्यता धूसर होती. अतिराष्ट्रवादी व्यासपीठावर लढलेल्या निवडणुकीत मुस्लिमांना उमेदवारी दिल्यास बहुसंख्य समाजाचा पाठिंबा गमावण्याच्या भीतीने राजकीय पक्ष सावध झाले. यामुळे राजकीय पक्षांनी मुस्लीम लोकसंख्या जास्त असलेल्या मतदारसंघातून मुस्लीम उमेदवार उभे करण्याची रणनीती अवलंबली आहे.

लोकसभेत भारतीय मुस्लिमांचे प्रतिनिधित्व अत्यंत कमी आहे. निमशहरी आणि शहरी मतदारसंघांमध्ये राहाणाऱ्या मुस्लिमांचे राजकीय प्रतिनिधित्व हे तुलनेत बरेच जास्त आहे. ग्रामीण मतदारसंघांमध्ये राहाणाऱ्या मुस्लिमांचे राजकीय प्रतिनिधित्व निमशहरी आणि शहरी मतदारसंघांपेक्षा कमी आहे. भारतीय मुस्लीम हा देशातील सर्वाधिक नागरीकरण झालेला धार्मिक गट आहे. २०१४ आणि २०१९ या दोन सार्वत्रिक निवडणुकांमध्ये निमशहरी आणि शहरी मतदारसंघातून लोकसभेत मुस्लिमांचे प्रतिनिधित्व २०१४ मध्ये १% आणि २०१९ मध्ये २% होते. तेथेही मुस्लीम लोकसंख्या ४०%पेक्षा जास्त असलेल्या २२ मतदारसंघातून बहुसंख्य लोकप्रतिनिधी निवडून आले. २०१४ आणि २०१९च्या लोकसभा निवडणुकीत ३३७ ग्रामीण मतदारसंघातील मुस्लीम प्रतिनिधित्व ४% होते. २०१९ मध्ये ग्रामीण मतदारसंघातील मुस्लीम प्रतिनिधित्व १%ने घटले आहे.

मुस्लीम प्रतिनिधित्व आणि २०२४ ची लोकसभा निवडणूक

२०२४ च्या लोकसभा निवडणूक प्रचारादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजस्थानमधील बांसवाडा येथील भाषणात असे वक्तव्य केले की, काँग्रेस सत्तेवर आल्यास लोकांची संपत्ती जास्त मुलं असलेल्या लोकांना वाटली जाईल. शिवाय ओबीसींचे आरक्षण काढून ते मुस्लिमांना दिले जाईल, असेही सांगितले गेले. पहिल्यांदाच पंतप्रधानांनी निवडणूक प्रचारात हिंदू-मुस्लीम राजकारणाचे कार्ड उघडपणे खेळले. त्यांनी मागील निवडणुकीत अशी थेट विधानं टाळली होती. नागरिकत्व (दुरुस्ती) कायदा, २०१९ च्या घटनात्मकतेला आव्हान देणाऱ्या सर्व याचिका न्यायालयात प्रलंबित असताना केंद्रीय गृहमंत्रालयाने अचानक वादग्रस्त नागरिकत्व (दुरुस्ती) नियमांची अधिसूचना जारी केली. महिन्याहून अधिक काळ चाललेल्या या प्रदीर्घ निवडणुकीत मंदिर, मशिदी इत्यादी मुद्द्यांवर एकामागून एक विशिष्ट समुदायांना लक्ष्य केलं गेले.

या लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपाने संपूर्ण देशभरात फक्त एका मुस्लीम व्यक्तीला उमेदवारी दिली होती. बिहारमध्ये भाजपाचा सहकारी पक्ष जेडीयूनेही एकाच मुस्लीम व्यक्तीला उमेदवारी दिली आहे. इंडिया आघाडीमधील महत्त्वाच्या आणि मोठ्या पक्षांनी दिलेल्या उमेदवारीमध्ये मुस्लिमांची संख्या घटल्याचे चित्र आहे. काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, समाजवादी पार्टी, राजद, माकप अशा सर्व राष्ट्रीय पक्षांनी मिळून फक्त ७८ मुस्लीम व्यक्तींना उमेदवारी दिली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत मुस्लीम उमेदवारांना उमेदवारी देण्याच्या एकूण संख्येत लक्षणीय घट झाली. २०१९ मध्ये राष्ट्रीय पक्षांनी दिलेल्या मुस्लीम उमेदवारांची संख्या ११५ होती.

२०२४च्या लोकसभा निवडणुकीत निवडून आलेल्या मुस्लीम खासदारांची संख्या २४ इतकी आहे. भारताच्या लोकसंख्येतील या समुदायाचा शे. १४% वाटा आहे. कनिष्ठ सभागृहात मुस्लीम प्रतिनिधित्व त्यांच्या एकूण ५४३ सदस्यांपैकी २४ म्हणजेच ४.४१ इतके आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून सर्वाधिक ७ मुस्लीम खासदार निवडून आले. त्यापाठोपाठ ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस ५, समाजवादी पक्ष ४, इंडियन युनियन मुस्लीम लीग ३, जम्मू-काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स २, ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन १ आणि २ अपक्ष आहेत. याचा अर्थ, २४ मुस्लीम खासदारांपैकी २१ भारतीय इंडिया आघाडीचे आहेत. बहुसंख्य म्हणजे ५ मुस्लीम खासदार पश्चिम बंगाल राज्यातून निवडून आले आहेत.

भाजपच्या 'संकल्प' पत्रात राममंदिराच्या प्रस्थापना सोहळ्याबाबत आणि अयोध्येत १० हजार कोटी रुपये खर्चून शहराला नवसंजीवनी देण्याचा आणि 'ग्लोबल सिटी' बनवण्याचा भाजपचा दावा त्या भागातील मतदारांना मान्य झालेला नाही. भाजपने राममंदिराच्या उद्घाटनासोबतच एक घोडदौड सुरू केली होती आणि त्यावेळी विरोधक खूप मागे राहिल्याचं दिसत होतं. पण लोकांच्या मनात काही वेगळंच होतं. अयोध्या विभागातील पाचही जागांवर फैजाबाद (अयोध्या), आंबेडकर नगर, सुलतानपूर, अमेठी आणि बाराबंकी इथला भाजपचा पराभव तेच सांगतो. राममंदिरासारखे मुद्दे मतदारांच्या स्मरणात राहिले नाहीत.

मुस्लीम मतदार इंडिया आघाडीकडे

पंतप्रधानांच्या धार्मिक ध्रुवीकरणाच्या राजकारणामुळे देशभर मुस्लीम मतदार इंडिया आघाडीकडे वळलेले दिसून येतात. बसपा, एमआयएम, वंचित बहुजन आघाडी इत्यादी पक्षांना मतदारांनी नाकारल्याने मत विभाजन टळलेले दिसून येते. देशपातळीवर विचार केला तर सीएसडीएस-लोकनीतीच्या अभ्यासानुसार मुस्लिमांनी इंडिया आघाडीला शे. ६५% मते दिलेली आहेत. २०१९ च्या निवडणुकीच्या तुलनेत ही मते शे. २०% वाढलेली आहेत. भाजपप्रणित एनडीएला १०% मुस्लिमांनी मते दिली आहेत. इंडिया आघाडीला जी ६५% मते मिळाली आहेत, त्यात शे. ३८% मते काँग्रेसला व २७% मते इतर मित्रपक्षांना मिळालेली आहेत. समाजवादी पक्ष आणि नॅशनल कॉन्फरन्स इंडिया आघाडीत आल्याचा यावेळी फायदा झाला आहे. २०१९ साली हे दोन्ही पक्ष काँग्रेससोबत नव्हते.

मुस्लीम संख्या लक्षणीय असलेल्या काही राज्यातील मुस्लिमांचा पसंतीक्रम येथे पाहाता येईल. लोकनीती सीएसडीएसच्या अभ्यासानुसार उत्तर प्रदेशात शे. ९२% मुस्लिमांनी सपा व काँग्रेस आघाडीला मत दिले. बिहारमध्ये इंडिया आघाडीला चांगले यश मिळाले नसले, तरी या आघाडीला शे. ८७% मुस्लिमांनी पाठिंबा दिला आहे. नितीशकुमार एनडीएत असूनही त्यांना फक्त १२% मुस्लिमांनी पाठिंबा दिला आहे. पश्चिम बंगाल मध्ये ७३% मुस्लिमांनी तृणमूल काँग्रेसला पाठिंबा दिला आहे. आंध्रप्रदेशमध्ये टीडीपी व जेएसपीला ३२% मुस्लिमांनी मते दिली आहेत. तर जगमोहन रेड्डींच्या वायएसआर काँग्रेसला ५३% मुस्लिमांनी मते दिली आहेत. दिल्लीमध्ये आप पक्षाला ४९%, काँग्रेसला ३४% तर भाजपला १४% मुस्लिमांनी पाठिंबा दिला आहे. कर्नाटकात ९२% मुस्लिमांनी काँग्रेसला पाठिंबा दिला. महाराष्ट्रात ७४% मुस्लिमांनी महाविकास आघाडीला पाठिंबा दिला आहे. देशभरात फक्त गुजरात या राज्यात मुस्लिमांनी भाजपला जवळ केलेलं दिसतं. गुजरातमध्ये ५९% मुस्लिमांनी काँग्रेसला तर २९% मुस्लिमांनी भाजपला मतदान केल्याचे दिसते. (संदर्भ- द हिंदू, ५ जून ते ११ जून २०२४)

काँग्रेस आघाडीला सन्मानजनक जागा प्राप्त होण्यात मुस्लीम मतदारांचा मोठा वाटा आहे. त्या तुलनेत काँग्रेस आघाडीने किमान भविष्यात तरी मुस्लिमांना अधिक संख्येने उमेदवारी देणे आणि निवडून आणणे आवश्यक आहे. तरच त्यांचा मुस्लीम जनाधार टिकेल. अन्यथा, तो विविध पक्षांत विभागाला जाण्याची शक्यता जास्तच आहे.

शहरी आणि ग्रामीण भारतातील हिंदू-मुस्लीम संबंधांची बदललेली गतिशीलतेचा निवडणुकीच्या राजकारणावर काही अंशी परिणाम होऊ शकतो. ग्रामीण भागात मुख्य संघर्ष जातीच्या अक्षावर असल्याने ग्रामीण भारत धार्मिक अक्षावरील ध्रुवीकरणापासून बराच काळ अलिप्त राहिला होता. आशुतोष वार्ष्णेय यांनी हिंदू-मुस्लीम दंगलींचे स्पष्टीकरण करताना असे म्हटले आहे की, दंगली ही प्रामुख्याने शहरी घटना आहे. शहरी भागातील कमकुवत नागरी किंवा संघटनात्मक जीवनामुळे दंगली होतात. स्टीव्हन विल्किन्सन यांनी सुचविलेली चौकट ग्रामीण वातावरणापर्यंत वाढविली जाऊ शकते. हिंदू-मुस्लीम दंगलींच्या मुळांशी राजकीय स्पर्धा आहे असे म्हणता येईल. तीव्र राजकीय स्पर्धेचे रूपांतर जातीय दंगलीत होऊ शकते. भाजपच्या निवडणुकीच्या यशाचे कारण ग्रामीण भागातही वाढलेले धार्मिक ध्रुवीकरण असे म्हणता येईल. स्थानिक पातळीवर वाढलेले ध्रुवीकरण, ज्याचे रूपांतर नेहमीच संपूर्ण दंगलीत होऊ शकत नाही. मात्र, यामुळे ग्रामीण भागातही धार्मिक अक्षावर ध्रुवीकरण वाढू शकते. ग्रामीण भागातील बदललेल्या सामाजिक घडामोडींचा राजकीय स्पर्धेच्या स्वरूपावर स्पष्ट परिणाम झाला आहे. धार्मिक तेढ निर्माण करून सवर्ण, मागास जाती आणि दलितांना एक गट म्हणून एकत्र आणले गेले. यामुळे मुस्लीम अल्पसंख्याक असलेल्या ग्रामीण मतदारसंघातून निवडून येणाऱ्या मुस्लीम उमेदवारांच्या संख्येत घट झाली असे म्हणता येईल. ज्या मतदारसंघात मुस्लीम मोठ्या संख्येने आहेत तेथेच मुस्लीम निवडून येण्याच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. याचे कारण ग्रामीण आणि शहरी मतदारसंघातील राजकीय स्पर्धेचे स्वरूप बदलले आहे.

पूर्वी राजकीय क्षेत्रात मुस्लीम अल्पप्रतिनिधित्वाची भरपाई करण्यासाठी राजकीय पक्षांनी अवलंबिलेली एक अनौपचारिक सुधारात्मक यंत्रणा म्हणजे राज्यसभेत त्यांच्या प्रातिनिधिक दाव्याला सामावून घेणे. राज्यसभेची निवडणूक राज्य विधिमंडळातील पक्षाच्या ताकदीवर अवलंबून असलेल्या निवडणुकीच्या अप्रत्यक्ष स्वरूपामुळे पक्षांना आपल्या उमेदवाराच्या विजयाबाबत खात्री असते. १९५२ पासून राज्यसभेत मुस्लिमांचे सरासरी प्रतिनिधित्व शे. १२% आहे. जे लोकसभेतील त्यांच्या प्रतिनिधित्वाच्या दुप्पट आहे. राज्यसभेत मुस्लिमांचे प्रतिनिधित्व १९५२ ते १९७७ या काळात १०%, १९७८ ते १९८९ या काळात १०% आणि १९९० ते २०१९ या काळात १२% इतके होते. भाजपच्या विस्ताराचा मुस्लीम प्रतिनिधित्वावर नकारात्मक परिणाम झाला आहे. २०१९ नंतर राज्यसभेत मुस्लिमांचे प्रतिनिधित्व शे. ७% झाले आहे. राज्यसभेच्या विद्यमान सदस्याचा कार्यकाळ संपुष्टात येत असल्याने त्यात आणखी घट होण्याची शक्यता आहे. भाजपच्या निवडणुकीच्या गणितात मुस्लीम

मतदारांची कमतरता असल्याने ते औपचारिक किंवा अनौपचारिक यंत्रणेद्वारे मुस्लीम प्रतिनिधींच्या दाव्यांना सामावून घेण्याची शक्यता नाही.

समारोप

मुस्लीम अल्पप्रतिनिधित्वाची कारणे गुंतागुंतीची आहेत. भारतातील मुस्लिमांचे विखुरलेले भौगोलिक वितरण आणि आरक्षणासारख्या न्याय्य यंत्रणांचा अभाव यामुळे मुस्लीम समाजाची गैरसोय झाली आहे. राजकीयदृष्ट्या कमी प्रतिनिधित्व असलेल्या गटांना अधिक उदार करण्यासाठी लोकशाहीत औपचारिक आणि अनौपचारिक उपाय दोन्ही ही असू शकतात. भारतीय घटनात्मक आराखड्यात राजकीय, सामाजिक आणि आर्थिक न्यायाची संकल्पना अस्तित्वात आहे. धार्मिक अस्मितेचा कोणताही दावा नाकारून केवळ सांस्कृतिक अधिकारांच्या क्षेत्रात धार्मिक समुदायांना मान्यता देण्यासाठी औपचारिक यंत्रणांचा विस्तार करतो. भारतातील मुस्लीम समाज राजकीयदृष्ट्या अल्प प्रतिनिधित्व असलेला समाज आहे. मुस्लीम समाज सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित आहे. मुस्लिमांना आरक्षणाच्या कक्षेत आणून अनुसूचित जाती-जमातींप्रमाणे सकारात्मक कृती करता येईल. धोरणात्मक बदल घडवून आणण्यास सरकारने टाळाटाळ केली. यामागची कारणे संस्थात्मक आणि राजकीय दोन्ही आहेत. अल्पसंख्याकांच्या मागणीला ऐतिहासिकदृष्ट्या धार्मिक अस्मितेने परिभाषित करण्याची सवय राज्यसंस्थांना आहे. आरक्षणाचे सध्याचे लाभार्थीही धार्मिक अल्पसंख्याकांना आरक्षण विस्ताराच्या तरतुदींना त्यांचे हक्क हिरावून घेणे असे मानतो. मुस्लीम समाजाला अशा कोणत्याही सवलतीला विरोध केला जातो. सांप्रदायिक ध्रुवीकृत, राजकीय आणि सामाजिक पूर्वग्रहदूषित याचा वापर भाजपने व्यापक सामाजिक युती करण्यासाठी केला आहे. मुस्लीम मतांची इच्छा असलेल्या राजकीय पक्षांनाही बहुसंख्याकांची मते न मिळण्याच्या भीतीने भारतीय मुस्लिमांच्या सामाजिक-आर्थिक वंचिततेवर तोडगा काढण्यात उदासीनता दाखविली आहे.

हिंदू राष्ट्रवादी भाजपची वाढती ताकद आणि हिंदू मतांचे अतिरेकी आवाहन यामुळे मुस्लीम मतांच्या पारंपरिक दावेदारांच्या निवडणुकीच्या गणितातही मुसलमान तोट्यात आहेत. बहुसंख्याकवादी प्रतिक्रियेच्या भीतीमुळे मुस्लीम समाजासाठी महत्त्वाचे मुद्दे मांडण्यास राजकीय पक्ष तयार नाहीत. त्यामुळे मुस्लीम प्रश्न मुख्य प्रवाहातील राजकीय चर्चेपासून अदृश्य करण्यात भाजपला यश आले आहे. यामुळे नव्या प्रकारच्या मुस्लीम राजकीय नेतृत्वाची लोकप्रियता वाढली आहे. विशेषत: एमआयएमचे नेते असदुद्दीन ओवेसी अशा नव्या प्रकारच्या मुस्लीम राजकीय नेतृत्वाचे प्रतिनिधित्व करतात. त्यांची आक्रमक लढाऊ वक्तृत्वशैली मोठ्या संख्येने मुस्लिमांना भावली आहे. ज्या मुद्द्यांबद्दल इतर बोलण्यास टाळाटाळ करतात अशी समुदाय-विशिष्ट मुद्द्यांची मांडणी त्यांनी केली. याचे रूपांतर राज्यव्यापी मुस्लीमप्रणित पक्षाच्या उदयात होऊ शकलेले नाही. मात्र हा कल काही काळ टिकण्याची शक्यता आहे.

लोकशाहीत निष्पक्ष प्रतिनिधित्व हे एक इष्ट ध्येय असते. वैविध्यपूर्ण आवाजांकडे दुर्लक्ष होऊ नये याची काळजी राज्यसंस्थेने घेतली पाहिजे. ऐतिहासिक, संस्थात्मक आणि स्थानिक कारणांमुळे राजकीय क्षेत्रात मुस्लिमांचे प्रतिनिधित्व सातत्याने कमी होत आहे. फाळणीचा ऐतिहासिक वारसा आणि भारतीय मुस्लीम समाज विविध प्रादेशिक भागात विखुरलेला असल्याने मुस्लिमांचे राजकीय प्रतिनिधित्व कमी झाले आहे. राजकीय अल्पप्रतिनिधित्वाचा मुद्दा सोडविण्यास त्यांच्या असमर्थतेमुळे राजकीय पक्षांना राजकीय क्षेत्रात मुस्लीम समाजाच्या चिंता व्यक्त करण्यापासून आणि प्रतिनिधित्व करण्यापासून रोखता आले नाही किंवा अनौपचारिक यंत्रणेद्वारे अल्पप्रतिनिधित्वाचा मुद्दा सोडविण्याचा प्रयत्नदेखील केला गेला नाही. आज मुस्लीमबहुल मतदारसंघातून निवडून येण्यासाठी केवळ मुस्लीम उमेदवार असणे व्यवहार्य आहे. हे मुस्लीम समाजाच्या राजकीय घराणेशाहीचे लक्षण आहे. मुख्य प्रवाहातील राजकीय पक्षांनी राजकीय अभिव्यक्तीला वाव देण्यास टाळाटाळ केल्याने हा समाज एका नव्या प्रकारच्या नेतृत्वाकडे वळला आहे, जे ठाम आणि स्पष्टवक्ते आहे. ते अद्याप

या नेतृत्वाला मत देऊ शकत नाहीत; परंतु तरीही समाजाचे प्रश्न मांडण्याची त्यांची तयारी असल्याने ते त्यांचे म्हणणे ऐकतात.

संदर्भ:

1. Anjishnu Das, 8 June 2024 Muslim representation in new Lok Sabha: 24 MPs, none from BJP-led NDA, The Indian Express.
2. Asim Ali, 30 December 2022, Changing features of Muslim representation in India, The Hindu.
3. Farooqui Adnan, 2020, Political representation of a minority: Muslim representation in contemporary India, INDIA REVIEW 2020, VOL. 19, No. 2, 153-175.
4. Feyaad Allie, 2020, Muslim Political Representation in India, Stanford.
5. Hilal Ahmed, 2022, Rethinking Muslim Political Representation in India, Philadelphia, The Center for the Advanced Study of India (CASI) of the University of Pennsylvania.
6. Hilal Ahmed, 13 June 2024, Myths demolished, The Telegraph.
7. Sreeparna Chakrabarty, 5 June 2024, Election results 2024: A key vote bank yet Muslim representation will remain low in the new Lok Sabha, The Hindu.
8. Subodh Varma, 26 Augest 2015, More religious minorities live in urban areas than rural, Times of India.

९. नितिन श्रीवास्तव, ५ फेब्रुवारी २०२४, नरेंद्र मोदींचे निवडणुकीतील चार मुद्दे, ज्यामुळे या निवडणुकीत नाही झाली आधीसारखी कामगिरी, बीबीसी मराठी स्पेशल.

◆

> ''लोकशाहीला अहिंसेचे अधिष्ठान युरोपात देण्यात आले नाही. तेथे लोकाशाहीची उभारणी व्यक्ती स्वातंत्र्य व संग्रह बुद्धीवर करण्यात आली. त्यामुळे हिंसावृत्ती आणि संग्रह बुद्धी यांनी तेथील लोकशाहीचा बळी घेतला आहे. केवळ बुद्धिबळाने आणि सनदशीर राजकारणाने आपले प्रश्न सुटत नाहीत हे तेथील लोकांच्या लक्षात आले आहे.''
>
> **– आचार्य शं. द. जावडेकर**